| | पोलीस अधीक्षक कार्यालय, नाशिक ग्रामीण | |
|---|---|---|
| | पोलीस मुख्यालय, आडगाव, नाशिक - पिन 422003<br>दुरध्वनी नंबर 0253-2309700<br>E.Mail- sp.nashik.r@mahapolice.gov.in | स्वातंत्र्याचा अमृत महोत्सव |

**प्रेस नोट** दिनांक : ३०/०१/२०२५

## येवला शहरात चैन स्नॅचिंग करणारे सराईत गुन्हेगारास अटक - नाशिक ग्रामीण स्थानिक गुन्हे शाखेची कारवाई

---

दि. १९/०१/२०२५ रोजी सायंकाळचे सुमारास येवला शहरातील यश लॉन्स परिसरात अज्ञात दोन चोरटयांनी पल्सर मोटर सायकलवर येवुन एका महिलेचे गळयातील सोन्याची पोत व दागिने ओढून चोरी केल्या बाबत येवला शहर पोलीस ठाणेस गुरनं ३६/२०२५ भा.न्या.सं.कलम ३०४(२) प्रमाणे गुन्हा दाखल करण्यात आला होता.

स्थानिक गुन्हे शाखेचे पोलीस निरीक्षक श्री. राजु सुर्वे यांचे पथकाने सदर गुन्हयाचे समांतर तपासात, यातील आरोपीतांचे वर्णन व त्यांनी वापरलेली पल्सर दुचाकी यावरून गोपनीय माहिती घेतली असता सदरचे गुन्हेगार हे अहिल्यानगर जिल्हयातील श्रीरामपुर येथील असल्याची खात्रीशीर बातमी मिळाली. त्याप्रमाणे स्थागुशाचे पथकातील अधिकारी व अंमलदार यांनी श्रीरामपुर शहरातील बस स्टॅन्ड परिसरातुन सराईत गुन्हेगार नामे **१) शाहरुख अफसर शेख, वय ३२, रा. वार्ड नं.६, श्रीरामपुर, ता.श्रीरामपुर, जि. अहिल्यानगर** यास ताब्यात घेतले. त्यास विश्वासात घेवुन वरील गुन्हयाबाबत चौकशी केली असता, त्याने व त्याचा साथीदार नामे २) गणेश मुंडे, रा. गोपीनाथ नगर, श्रीरामपुर, जि.अहिल्यानगर यांनी दोघांनी पल्सर मोटर सायकलवर येवुन येवला शहरातील एका लॉन्सचे परिसरातुन महिलेची सोन्याची पोत व दागिने ओढुन चोरी केली असल्याची कबुली दिली आहे. यातील ताब्यात घेतलेला आरोपी शाहरुख शेख यास येवला शहर पोलीस ठाणेकडील वरील गुन्हयात अटक करण्यात आली असून त्याचा साथीदार गणेश मुंढे हा श्रीरामपुर शहर पोलीस ठाणेकडील गुरनं ४१/२०२५ भा.न्या.सं. कलम ३०९ या गुन्हयात अटक असून सध्या न्यायालयीन कस्टडीमध्ये आहे. सदर गुन्हयाचा पुढील तपास येवला शहर पोलीस ठाणेकडील अधिकारी व अंमलदार करीत आहे.

**आरोपी शाहरुख अफसर शेख याचेविरूध्द दाखल गुन्हयांची माहिती.**

१) श्रीरामपुर शहर पो.स्टे. जि.अहिल्यानगर, गुरनं २९७/२०१५ भादवि ३९४,३४
२) कोपरगाव शहर पो.स्टे. जि.अहिल्यानगर, गुरनं ११३/२०१५ भादवि ३७९,३४
३) श्रीरामपुर शहर पो.स्टे. जि.अहिल्यानगर, गुरनं १८/२०१५ भादवि ३९२,३४
४) वावी पो.स्टे. गुरनं ५८/२०१७ भादवि ३८०,३४
५) शिर्डी पो.स्टे. जि.अहिल्यानगर गुरनं ७६१/२०१९ भादवि ३७९,३४

सदर आरोपी शाहरुख शेख हा सराईत गुन्हेगार असुन वरील गुन्हयाचे तपासात त्याचेकडून मालाविरूध्दचे आणखी गुन्हे उघडकीस येण्याची शक्यता आहे.

नाशिक ग्रामीण जिल्हा पोलीस अधीक्षक श्री. विक्रम देशमाने, अपर पोलीस अधीक्षक श्री. आदित्य मिरखेलकर, अपर पोलीस अधीक्षक मालेगाव श्री. अनिकेत भारती यांचे मार्गदर्शन व सुचनांप्रमाणे स्थानिक गुन्हे शाखेचे पोनि श्री. राजु सुर्वे, पोउनि प्रकाश भालेराव, पोहवा सचिन देसले, पोलीस अंमलदार किशोर बोडके, रोहित पगारे, हेमंत गिलबिले, प्रदिप बहिरम यांचे पथकाने सदर चैन स्नॅचिंगचा उघडकीस आणुन कामगिरी केली आहे.